# कोल्हापूर महानगरपालिका

## शहर पाणी पुरवठा विभाग

## जाहीर आवाहन

कोल्हापूर शहर व आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांना जाहीर आवाहन करणेत येत आहे की -

- ☞ नागरिकांनी नवीन नळ कनेक्शन घेताना अथवा जुने बंद असलेले कनेक्शन पूर्ववत सुरु करताना महानगरपालिकेच्या नोंदणीकृत प्लंबरमार्फतच नळ जोडणीचे काम करुन घ्यावे. याकामी नियमानुसार विहीत नमून्यातील फॉर्म व शुल्क अधिकृत नागरी सुविधा केंद्रामध्ये भरुन त्याची रितसर भरणा पावती घ्यावी. यासाठी महानगरपालिकेकडील कोणत्याही कर्मचा-यास पैसे देवू नयेत. बंद मिटर दुरुस्त करणे अथवा नवीन मिटर बदलणेसाठी महापालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास पैसे देऊ नयेत. यामध्ये फसवणूक झालेस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
- ☞ नवीन नळ कनेक्शन घेतल्यानंतर संबंधित प्लंबरकडून फी भरलेल्या पावत्या व अनुषंगीक कागदपत्रे आपले ताबेत घेणेची आहेत. तसेच पाणी सुरु केले दिनांकापासून 4 महिन्यात प्रथम बिल न आलेस मुख्य कार्यालयाशी त्वरित संपर्क साधून बिलाबाबतची पूर्तता करुन घ्यावी.
- ☞ पाणी मिटरबंद / नादुरूस्त / मोडतोड अथवा अन्य कारणास्तव खराब झाले असलेस संबधित नळ कनेक्शनधारकांनी शिवाजी मार्केट येथील पाणीपट्टी शाखेशी संपर्क साधून नागरी सुविधा केंद्रामधून विहीत नमुन्यातील छापील अर्ज व योग्य ती फी भरुन घेवून स्थानिक बाजारात उपलब्ध असलेले नविन मिटर स्वखर्चाने बसविणेचे आहे. यासाठी महानगरपालिकेकडील कोणत्याही कर्मचा-यास/मिटर रिडरला पैसे देवू नयेत. यामध्ये फसवणूक झालेस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
- ☞ पाणी बिलाची रक्कम महानगरपालिकेच्या अधिकृत भरणा केंद्रामध्येच भरुन त्याची रितसर संगणकीकृत पोहोच पावती घ्यावी. महापालिकेच्या अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याकडे बिलाची रक्कम देऊ नये. यामध्ये फसवणूक झालेस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
- ☞ नवीन किंवा जुनी घर/मिळकत खरेदी करण्यापूर्वी सदर मिळकतीवर महानगरपालिकेची कोणतीही थकबाकी नसल्याबाबतचा **'ना हरकत दाखला'** महापालिकेच्या सर्व संबंधित विभागाकडून घ्यावा. जेणे करुन जुन्या मिळकतधारकाची थकबाकी नवीन मिळकत धारकाला लागू होऊन फसवणूक होणार नाही.
- ☞ मिटर रिडर ज्यावेळी मिटर रिडींग नोंद करणेस येतात, त्यावेळी आपल्या मिटरमधील प्रत्यक्ष रिडींग व मिटर रिडरकडील रजिस्टरमध्ये नोंद केलेली रिडींग एकच असलेची खात्री करुन रिडींग रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करावी, जेणेकरुन चुकीची बिल आकारणी होऊन फसवणूक होणार नाही. तसेच ठराविक कालावधीनंतर वेळोवळी मिटर मधील नोंदी तपासून पहाव्यात व मिटर सुरु असलेची खात्री करावी.
- ☞ एखादा कनेक्शनधारक बांधकाम करणार असेल व त्यांना बांधाकामासाठी महानगरपालिकेच्या पाण्याची आवश्यकता नसेल, तसेच दीर्घ मुदतीसाठी पाणी वापर करणार नसेल त्यांनी रितसर अर्ज

करुन तूट मुदतीचे बिल व सोडबंद फी भरुन तात्पुरते कनेक्शन बंद करुन घ्यावे. जेणे करुन वाढीव बिल येणार नाही. अशा प्रकारे तात्पुरते बंद केलेले कनेक्शन सोडबंद फी भरुन पुनश्च सुरु करता येते. त्यामूळे अनावश्यक बिल टाळून पैशाची बचत करता येते.

☞ नळ कनेक्शनधारकांची सन 2008-09 पासूनची पाणी बिलाबाबतची संपूर्ण संगणकीकृत तपशिलवार माहिती **www.kolhapurcorporation.gov.in** या वेबसाईटवरील नागरी सुविधा - पाणी पुरवठा विभाग - "**know your dues**" या लिंकखाली उपलब्ध करणेत आलेली आहे. यामध्ये **pdf** स्वरुपातील पाणी बिल मोफत **download** करणेची सुविधा उपलब्ध आहे. तसेच, सदर वेबसाईटच्या मुख्यपृष्ठावर पाणी बिलाची रक्कम ऑनलाईन भरणा करणेसाठी "**Online Payment**" सुविधा उपलब्ध करणेत आलेली आहे. यामध्ये एक वेळ रजिस्ट्रेशन करुन डेबीट/क्रेडीट कार्डद्वारे पाणी बिलाची रक्क्म भरता येते.

☞ बिलामध्ये मिटर स्थिती **"OK"** असलेची खात्री करावी. मिटर बंद/नादुरुस्त/मोडतोड असलेस ऑफीसशी संपर्क साधून नोंदणीकृत प्लंबरकडून त्वरित नवीन मिटर बसविणेत यावा. अन्यथा प्रचलीत नियमानुसार स्थिर/सरासरी दराने वाढीव बिलाची आकारणी केली जाते. बिलाबाबत कांही तक्रार असल्यास बिल दिलेल्या दिनांकापासून 7 दिवसांचे आंत पाणीपट्टी विभाग, शिवाजी मार्केट येथे लेखी स्वरुपात तक्रार दाखल करावी. अन्यथा मुदतीनंतर तक्रार विचारात घेतली जाणार नाही. महापालिकेच्या प्रचलीत नियमाप्रमाणे द्विमासिक बिलाची आकारणी केली जाते. तथापि, अपवादात्मक स्थितीत विहीत मुदतीत बिल न मिळालेस संबंधित मिटर रिडर अथवा पाणीपट्टी अधिक्षक यांचेशी संपर्क साधून बिल प्राप्त करुन घ्यावे.

☞ कनेक्शनधारकांनी आपले पाणी मिटर अंधारात किंवा अडचणीचे ठिकाणी न बसवता, सुस्पष्ट व रिडींग घेणेस सुलभ होईल अशा ठिकाणी व योग्य पध्दतीने बसवावे. जेणे करुन योग्य मिटर रिडींग घेणे शक्य होईल.

☞ मिटरच्या मागे फाटा देऊन चोरुन पाणी वापरु नये. असे केलेचे आढळून आलेस चोरुन पाणी वापर केलेबद्दल रु.25000/- पर्यंत दंड, पाणी वापराऱ्याच्या दुप्पट बिल व फौजदारी गुन्हा नोंद केला जाईल.

☞ नळाला विद्युत मोटर लावून पाण्याचा उपसा करु नये. यामूळे आजूबाजूच्या नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळते. सदरची बाब निदर्शनास आलेस दंड व मोटार जप्त केली जाईल.

☞ ज्या नळ कनेक्शनधारकांची थकबाकी रु.10,000/- पेक्षा जास्त अशा कनेक्शनधारकांनी थकीत रक्क्म त्वरित भरणा करावी व कनेक्शन खंडीत करणेची कटू कारवाई टाळावी.

उपरोक्त प्रमाणे सर्व नागरिकांनी खबरदारी घेणेबाबत महानगरपालिकेमार्फत आवाहन करणेत येत आहे.

जल अभियंता
शहर पाणी पुरवठा विभाग
कोल्हापूर महानगरपालिका